पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/७६१ /२०१५
दिनांक : ३०/१०/२०१५

प्रति,

मा.....................................
सदस्य, विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

विषय – पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षिक सभा दिनांक **०६/११/२०१५** रोजी आयोजित केलेबाबत...

महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षिक सभा शुक्रवार दिनांक **०६/११/२०१५** रोजी दुपारी **३.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे, ही विनंती.

मा.कळावे,

आपला विश्वासू,



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत – १) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

Z:\e drive\Nagersachiv1\New Folder\Ele 2015 sub committee sabhapati.doc

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८.

**मा.विधी समिती सभा**

कार्यपत्रिका क्रमांक – ५

दिनांक – **०६/११/२०१५** वेळ – दुपारी **३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षिक सभा शुक्रवार दिनांक **०६/११/२०१५** रोजी दुपारी **३.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

----------

दिनांक १६/१०/२०१५ रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्रमांक ४)** सभावृत्तांत कायम करणे.

---------

विषय क्र.१) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विद्युत विभागाअंतर्गत होणा-या विविध विकास कामाअंतर्गत उर्जाबचतीकामी एल.ई.डी. फिटींग्ज निविदा कामानुसार खरेदी करून उभारणी केल्या जातात. सदर एल.ई.डी.फिटींग्जची एकत्रितपणे खरेदी केल्यास उत्पादक कंपनींकडून स्पर्धात्मक दर प्राप्त होतील व दर्जात्मक साहित्यही प्राप्त होईल. या करीता विद्युत विभागाकडून एकत्रितपणे आवश्यक एल.ई.डी फिटींग्जची एकत्रित खरेदी करण्यात याव्यात अशा सुचना मा.आयुक्त यांनी केल्या आहेत.

त्यानुसार सर्व क्षेत्रीय कार्यालय व उद्यान विभागाकडून सन २०१५-१६ चे अंदाजपत्रकातील "उर्जा बचतीची उपकरणे व स्ट्रीट लाईट नूतनीकरण करणे" व " सार्वजनिक सुरक्षितता" आणि "उद्याने" या लेखाशिर्षावरील कामाअंतर्गत एल.ई.डी. फिटींग्जची मागणी व त्याकरीता आवश्यक तरतूदीसह दिलेल्या माहीतीनुसार, सर्व क्षेत्रीय कार्यालय व उद्यान या विभागांकडून केलेल्या मागणीनुसार सदर कामात वेगवेगळ्या क्षमतेचे एल.ई.डी फिटींग्जसाठी खालील नमूदनुसार खर्च अपेक्षित आहे. तर क्षेत्रीय कार्यालय व उद्यान विभागाकडून सदर नमूद लेखाशिर्षावर एल.ई.डी. फिटींग्जसाठी राखून ठेवलेली उपलब्ध तरतूदीतून सदर खर्च करता येईल.कामांचे वर्गीकरण करतांना प्रपत्र १ ,२ व ३ अन्वये वाढ / घट तक्त्यानुसार करणेत आलेली आहे.

या लेखाशिर्षांतंर्गतचे कामांचे अनुषंगाने खालील नमूदनुसार एकूण खरेदीचे ३ स्वतंत्र कामांमध्ये वर्गीकरण केल्यास कामात सुसुत्रता येईल.

| अ. क्र. | सन २०१५-१६ अंदाजपत्रकातील लेखाशिर्ष | नव्याने नमूद कामाचे नांव | वर्गीकरण करावयाचे लेखाशिर्ष | वर्गीकरण करावयाची प्रशा.मान्यता | वर्गीकरण करावयाची तरतूद (वाढ -घट तक्त्यानुसार) |
|---|---|---|---|---|---|
| १ | उर्जा बचतीची उपकरणे व स्ट्रीट लाईट नूतनीकरण करणे | अ,ब,क,ड,ई व फ क्षेत्रीय कार्यालयाचे कार्यक्षेत्रातील विभागातील जुन्या सो.व्हे. फिटींग्ज काढून उर्जा बचतीकामी एल.ई.डी. फिटींग्ज खरेदी करणे. | उर्जा बचतीची उपकरणे व स्ट्रीट लाईट नूतनीकरण करणे. | ५३०००००० | ४९४२४१०० |
| २ | सार्वजनिक सुरक्षितता | अ,ब,क,ड,ई व फ क्षेत्रीय कार्यालयाचे कार्यक्षेत्रातील लेखाशिर्षावरील कामांकरीता मागणीनुसार उर्जाबचती कामी मध्यवर्ती भांडारा मार्फत एल.ई.डी. फिटींग्ज खरेदी करणे. | मध्यवर्ती भांडार विद्युत साहित्य खरेदी | १२०००००० | ११९६००० |
| ३ | उद्यान विद्युत | उद्यान/भु.ग.यो./ज.शु.कें. मधील विद्युत कामांकरीता मागणीनुसार उर्जाबचतीकामी एल.ई.डी. फिटींग्ज खरेदी करणे. | उद्यान विद्युत | ४७०००००० | ४३५५२०८ |
| | | **एकूण** | | **६९७००००००** | **६४९७५३०८** |

सबब उपरोक्त नमूद प्रमाणे सन २०१५-१६ चे अंदाजपत्रकात "उर्जा बचतीची उपकरणे व स्ट्रीट लाईट नूतनीकरण करणे " व " सार्वजनिक सुरक्षितता" आणि "उद्याने" या लेखाशिर्षाअंतर्गत विविध प्रकारच्या एल.ई.डी फिटींग्ज खरेदीकामी उपरोक्त नमूद तीन नविन कामांचा सामावेश करून कामांसाठी लागणारी तरतूद व शिल्लक तरतूद यानुसार वाढ / घट तक्त्यानुसार( प्रपत्र १ २ व ३ ) नमूद लेखाशिर्षानिहाय वर्गीकरण करणेस व त्याकरीताच्या कामास व खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

विषय क्र.२) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या माध्यमिक शिक्षण विभागाच्यावतीने १८ माध्यमिक विद्यालये कार्यरत आहेत. सदर विद्यालयांपैकी माध्य.विद्या. कासारवाडी, संत तुकारामनगर, नेहरुनगर, भोसरी, निगडी, थेरगाव, काळभोरनगर, पिंपळे सौदागर व क्रीडा प्रबोधिनी विद्यालय या ०९ विद्यालयात इ.५ वी ते ७ वी चे वर्ग आहेत. सदर विद्यालयांपैकी तुर्त माध्य. विद्या.

कासारवाडी, माध्य. विद्या. नेहरुनगर, माध्य. विद्या. संत तुकारामनगर या तीन विद्यालयातील इ.५ वी ते ७ वी चे वर्ग (शिक्षकासह) प्राथमिक शिक्षण मंडळाकडे वर्ग करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी – १८. नगरसचिव विभाग
क्रमांक : नस/४/कावि/७६१/२०१५
दिनांक : ३० /१०/२०१५

टिप - प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेटस) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.